# महाराष्ट्र शासन

जा.क्र.मअसे/६१-ए/२०११/७८४

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.

दूरध्वनी क्र.२६६७ ०४३९
फॅक्स क्र.  २६६६ ०२८७

दिनांक : ०८ ऑगस्ट, २०११.

विषयः महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम,२००९ अंतर्गत राज्यात आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या प्रयोजनार्थ लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून काम करण्याकरीता लायसन्स देणेबाबत.

संदर्भः या संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.संअसे-२०११/लाअ/प्र.क्र.१, दिनांक : १२ मे, २०११.

## का र्या ल यी न  आ दे श

संदर्भाधीन या संचालनालयाच्या दिनांक १२ मे,२०११ च्या कार्यालयीन आदेशान्वये ४० अभिकरणांना दिनांक १२.०५.२०११ ते ११.०५.२०१२ या कालावधीकरीता लायसन्स मंजूर करण्यात आली आहेत. त्यानंतर या संचालनालयाकडे लायसन्स एजन्सी म्हणून नियुक्त करण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नियम १२ व १३ मधील अटींची पूर्तता करणाऱ्या या कार्यालयीन आदेशाच्या सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या ५९ अभिकरणांना आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या प्रयोजनार्थ लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून दिनांक ०८.०८.२०११ ते ०७.०८.२०१२ या कालावधीकरीता काम करण्याकरिता लायसन्स मंजूर करण्यात आली आहेत. सदरचा तपशील www.maharashtrafireservices.org व www.mfsindia.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच यापुढेही वेळोवेळी संचालनालयाकडून नियमांची पूर्तता करणा-या एजन्सींना लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून मंजूरी दिली जाईल.

०२.	दिनांक १२ मे, २०११ च्या कार्यालयीन आदेशान्वये लायसन्सप्राप्त अभिकरणांकडून कामे करुन घेण्याबाबतच्या सुचनांचा पुनरुच्चार पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

०३.	महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम ३(२) अन्वये कोणत्याही इमारतीला बांधकामाकामाचा परवाना देण्याअगोदर सदर अधिनियमाच्या कलम ३ प्रमाणे अग्निप्रतिबंधक उपाययोजनांचे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय बांधकामाचे परवाने देण्यात येऊ नयेत तसेच सदर प्रमाणपत्राप्रमाणे कामे पुर्ण केल्याशिवाय इमारतीच्या पुर्णत्वाचे (भोगवटा प्रमाणपत्र) देण्यात येऊ नये अशी तरतूद आहे.

०४.	राज्यातील बहुतांशी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांकडे असणारी सक्षम अधिकाऱ्यांची तूट लक्षात घेता, अग्निप्रतिबंधक उपाययोजनांच्या

प्रमाणपत्रासाठी सादर करण्यात येणारे अर्ज लायसन्सधारक अभिकरणांकडून सादर झाल्यास अधिकाऱ्यांच्या कामाची जबाबदारी व ताण कमी करणे शक्य होईल.

त्याचप्रमाणे बांधकामाच्या पुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी आवश्यक ते अंतिम अग्निप्रतिबंधक व जीवसुरक्षा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करतांना सुध्दा लायसन्सप्राप्त अभिकरणांकडून महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ च्या नियम १३(३)(क) मध्ये विहित केलेली सर्व कामे पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांनी परवानाधारक अभिकरणांकडून घेतल्यास परवाने देण्याच्या कामात पारदर्शकता व सुसुत्रता येईल.

०५. राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांनी देखील लायसन्सप्राप्त अभिकरणे नेमण्याची कार्यवाही चालू ठेवावी. महानगरपालिका/नगरपरिषदांनी आतापर्यंत अशी लायसन्सप्राप्त अभिकरणे नेमण्यासाठी केलेले प्रयत्न व नियुक्त केलेल्या अभिकरणांची माहिती या संचालनालयास तात्काळ कळवावी, जेणेकरुन याबाबतचा डेटा बेस वेळोवेळी अद्ययावत करता येईल.

०६. दिनांक १२ मे, २०११ च्या परिच्छेद-०६ मध्ये स्पष्ट केल्यानुसार या संचालनालयाकडून वेळोवेळी **www.maharashtrafireservices.org** व **www.mfsindia.org** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणाऱ्या लायसन्सप्राप्त अभिकरणाकडून अथवा संबंधित महानगरपालिका/नगरपरिषदा अथवा विशेष नियोजन प्राधिकरणांनी मंजूर केलेल्या अभिकरणांकडूनच अग्निप्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजनांचे काम करुन घेणे अनिवार्य आहे. अन्यथा संबंधित प्राधिकरणांचे मुख्य अग्निशमन अधिकारी / अग्निशमन दलाचे प्रमुख जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

०७. या संचालनालयाने दि.१२.०५.२०११ च्या कार्यालयीन आदेशान्वये मंजूर केलेली ४० लायसन्सप्राप्त अभिकरणे आणि या कार्यालयीन आदेशान्वये मंजूरी दिलेली ५९ लायसन्स प्राप्त अभिकरणे यांना तसेच यापुढे वेळोवेळी मंजुरी दिल्या जाणाऱ्या अभिकरणांना राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, विशेष नियोजन प्राधिकरणे व इतर क्षेत्रात व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत बांधकाम आराखड्यांना मंजुरी दिले जाते अशा क्षेत्रांतून प्राप्त होणाऱ्या बांधकाम परवाने, विकास कामे, टाऊनशीप इत्यादींना सर्व ठिकाणी आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनेंतर्गत बसविण्यात येणाऱ्या अग्निशमन उपाययोजनांचे काम करण्यास त्यांना अनुज्ञेय असलेल्या वर्गातील विहित आर्थिक मर्यादेपर्यंत लायसन्सप्राप्त अभिकरण काम करु शकतील. मात्र या अभिकरणाव्यतिरीक्त अशा क्षेत्रात महानगरपालिकांनी मंजुरी दिली असेल तर प्राधिकरण संस्थांनी केवळ त्यांच्याच क्षेत्रामध्ये अग्निशमन उपाययोजनेसंबंधी कामे करता येतील. थोडक्यात, सांगावयाचे झाल्यास महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाने लायसन्स दिलेल्या अभिकरणांना लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून त्यांच्या वर्गानुसार महाराष्ट्र राज्यात कामे करता येतील.

सदर कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्याची पोच द्यावी.

( एम. व्ही. देशमुख)
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

सहपत्र : परिशिष्ट-अ

प्रत:

१) मा.प्रधान सचिव-१, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

२) मा.प्रधान सचिव-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३) मा.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पू), मुंबई-४०००५१.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी-पूर्व, मुंबई-४०००९३.
५) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई-४०० ६१४.
६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण, वांद्रे (पू), मुंबई-५१.
७) मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका.
८) मा.आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०००३०.
९) मा.संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) अध्यक्ष, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, ट्राम्बे, मुंबई-४०० ०८५.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पॉवर जनरेशन कं.लि. (महाजनको), प्रकाशगड, वांद्रे-पूर्व, मुंबई-४०० ०५१.
१२) सर्व जिल्हाधिकारी.
१३) मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ.
१४) महाव्यवस्थापक, मुंबई महानगर टेलिफोन निगम लि., फोर्ट, मुंबई-४०० ००१.
१५) महाव्यवस्थापक, भारत संचार निगम लि., फोर्ट, मुंबई-४०० ००१.
१६) महाव्यवस्थापक, रिलायन्स एनर्जी, प्रभात कॉलनी, सांताक्रूझ-पूर्व, मुंबई.
१७) महाव्यवस्थामक, टाटा पॉवर कंपनी, टाटा बॉंबे हाऊस, २४,होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-१.
१८) अग्निशमन अधिकारी, सिडको, नवी मुंबई-४०० ६१४.
१९) मुख्य अग्निशमन अधिकारी, सर्व महानगरपालिका/विशेष नियोजन प्राधिकरणे.
२०) मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका.
२१) अग्निशमन अधिकारी, सर्व नगरपालिका/नगरपंचायती.
२२) परिशिष्ट-अ मधील सर्व लायसन्स अभिकरणे.
२३) उप सचिव, नगर विकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२४) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग (नवि-२०), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२५) निवड नस्ती (म.अ.से. संचालनालय).